
॥ शताब्दी वर्ष ॥


मकर संक्रांत १९२३

# युगवाणी

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक

जानेवारी–फेब्रुवारी–मार्च /एप्रिल–मे–जून २०२२





**दामोदर मावजो** (ज्ञानपीठ पुरस्कार २०२१ विजेते साहित्यिक) डिजिटल पोर्ट्रेट : महेश वेंगुर्लेकर, पणजी, गोवा

विदर्भ साहित्य संघाचे वाङ्मयीन नियतकालिक
वर्ष ७६ वे
जानेवारी–फेब्रुवारी–मार्च /एप्रिल–मे–जून २०२२

# युगवाणी

## गोमंतक विशेष

**संपादक**
प्रफुल्ल शिलेदार

**संपादक**
प्रफुल्ल शिलेदार

**संपादकीय पत्रव्यवहार**
प्रफुल्ल शिलेदार, ६अ, दामोदर कॉलनी, सुरेंद्रनगर, नागपूर - ४४० ०१५
ई-मेल : edityug@gmail.com

**प्रकाशक**
विलास मानेकर, सरचिटणीस, विदर्भ साहित्य संघ,
सांस्कृतिक संकुल, झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२
दूरध्वनी : ०७१२-२५२३९२९, २५५३७६७

**मुखपृष्ठ :** मारिओ मिरांडा (चित्र : घोडेमोडणी)
मारिओ मिरांडा यांचे मुखपृष्ठावरील चित्र गेरार्ड डिकुन्हा, क्युरेटर, मारिओ गॅलरी, आर्किटेक्चर ऑटोनॉमस, बार्देज, गोवा यांच्या परवानगीने मुद्रित केले आहे. त्यांचे मनःपूर्वक आभार.
मुखपृष्ठ क्र. २ व ३ वरील चित्रे श्री. महेश वेंगुर्लेकर, पणजी, गोवा यांची डिजिटल पेंटिंग्ज आहेत. त्यांचे मनःपूर्वक आभार.

**मुखपृष्ठावरील सुलेखन :** शुभानंद जोग

**जाहिरात सहयोग :** प्रदीप दाते, वर्धा

**मुद्रितशोधन :** दीपक रंगारी

**अक्षरजुळणी व मुद्रण :**
माधव लोखंडे, मलय ग्राफिक्स, नागपूर । भ्रमणभाष : ९३२६९९९०१५

**युगवाणीच्या वर्गणीबाबत सूचना :**
- युगवाणीची वर्गणी आपण 'युगवाणी-विदर्भ साहित्य संघ' या नावाने धनादेशाद्वारे पाठवू शकता.
- युगवाणीची वर्गणी थेट बँक खात्यातही जमा करता येईल.

Bank Account :
**'YUGWANI-VIDARBHA SAHITYA SANGH'**
Bank of Baroda, Sitabuldi Branch, Nagpur
**A/c. No.: 04650100 005638**
RTGS/IFSC Code : BARB0SITABU
Fifth Character is 'ZERO'

SCAN TO PAY
WITH ANY BHIM UPI APP
YUGWANI AND VIDARBHA SAHITYA SANGH

- युगवाणीची वर्गणी संपली असल्यास नूतनीकरण अवश्य करावे.

**व्यवस्थापन :**
**वर्गणीबाबत आणि अंक नियमित मिळण्याबाबत संपर्क :**
सना पंडित, व्यवस्थापक, युगवाणी, द्वारा : विदर्भ साहित्य संघ, सांस्कृतिक संकुल,
झाशी राणी चौक, सीताबर्डी, नागपूर-४४० ०१२ । भ्रमणभाष/व्हाट्सअॅप : **७७०९०४७९३३**

**प्रकाशनाची कालनियतता :** त्रैमासिक (जाफेमा, एमेजू, जुऑस, ऑनोडि)
**या जोडअंकाचे देणगी मूल्य : २०० रुपये (टपाल खर्च ४० रुपये वेगळा)**
**वार्षिक वर्गणी : ४०० रुपये, त्रैवार्षिक वर्गणी : १००० रुपये**
**वि.सा. संघाच्या आजीव सभासदांना युगवाणीचे अंक मिळण्याकरिता विशेष सवलतीत त्रैवार्षिक वर्गणी ५०० रुपये भरणे गरजेचे आहे.**

- महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाने 'युगवाणी'च्या प्रकाशनार्थ अनुदान दिले आहे.
- या अंकात व्यक्त झालेल्या मतांशी महाराष्ट्र शासन, म.रा. साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई तसेच युगवाणीचे संपादक आणि विदर्भ साहित्य संघाचे पदाधिकारी सहमत असतीलच असे नाही.

**यु ग वा णी ।** **जानेवारी-फेब्रुवारी-मार्च /एप्रिल-मे-जून २०२२**

# अं त रं ग ।

संपादकीय/४

**कविता :** अनुराधा पाटील / सुचेता खल्लाळ / विनोद कुमरे / रवी कोरडे /**५**

***गोमंतक विशेष***
**जन्मशताब्दी : शंकर रामाणी**
मर्मगूढ कवी : **माधव बोरकार /१८**
शंकर रामाणींची प्रतिमासृष्टी : **अनुजा जोशी /३२**

**पुनर्वाचन :** शंकर रामाणींच्या काही कविता /४२

**ज्ञानपीठ पुरस्कार २०२१ : दामोदर मावजो**
**भाषण :** साहित्याने मला आत्मा शाबूत ठेवायला शिकवले : **दामोदर मावजो /४६**
**कथा :** बर्फ वितळतो तेव्हा... : **दामोदर मावजो**/अनुवाद : **शैला मावजो /५६**

**लेख**
गोमंतकाची मराठी परंपरा : **परेश प्रभू /६२**

**कथा**
देवघेव : **प्रशांत बागड /६९**

**जीवनव्रती पुरस्कार**
संत साहित्य हीच माझी जीवन-निष्ठा आहे - **उषा देशमुख** यांची मुलाखत
**श्यामला मुजुमदार** आणि **वृषाली देशपांडे /७५**

**भाषाभान**
तौलनिक साहित्याभ्यास आणि भाषांतर : **आंद्रे लेफेवेअर**
प्रस्तावना, भाषांतर आणि टिपा : **चिन्मय धारूरकर, मिलिंद मालशे /८४**

**कवितांतर : पोर्तुगाली कविता**
फर्नांदो पेसोआच्या सात कविता आणि टिपण : **महेश्वर लव्हेकर /९८**

**विदर्भ साहित्य संघ कार्य वृत्त /१०९**

# संपादकीय

**मराठी** भाषा ही काही महाराष्ट्रापुरती मर्यादित नाही याची जाणीव असूनही आपण मराठी भाषेचा विचार करताना महाराष्ट्राबाहेरील मराठी भाषकांचा, त्यांच्यापुढील प्रश्नांचा आणि त्यांच्या योगदानाचा क्वचितच विचार करताना दिसतो. स्वातंत्र्यानंतर आपण भाषावार प्रांतरचना स्वीकारली असली तरी भाषिक समूह हे विशिष्ट राज्यापुरते सीमित न राहता सर्वदूर विखुरलेले आहेत. जागतिकीकरणाच्या रेट्यामुळे तर ही प्रक्रिया सगळ्याच भाषांच्या बाबतीत वेगाने होते आहे.

या विखुरलेल्या भाषिक समूहांना मनातून बांधून ठेवणारे भाषा हे मुख्य सूत्र आहे. आपापल्या परीने भाषाप्रांताच्या बाहेर आपली भाषा जपून ठेवण्याचे प्रयत्न भाषिक समूह करत असतात. यात आपल्या भाषेसह आपल्या संस्कृतीची जपणूक करण्याची भावना असते; त्याचप्रमाणे भाषिक अस्मिता जपण्याचा हेतूही असतो. अनेकदा स्थानिक प्रमुख भाषा आणि इतर भाषा यात भाषिक अस्मितेतून संघर्ष होतानाही दिसतो. भाषाप्रांताबाहेरच्या भाषा स्थानिक लोकव्यवहाराच्या किंवा शासनव्यवहाराच्या भाषा नसतात. त्यामुळे त्यांना तिथे अनेक व्यावहारिक अडचणी येत असतात. यावर मात करत भाषा जपण्याचा आटोकाट प्रयत्न तिथे केला जातो.

मराठी भाषेच्या बाबतीत आपल्याला महाराष्ट्राबाहेर अशी अनेक ठिकाणे दिसून येतात जिथे मराठी भाषेने चांगले मूळ धरले आहे आणि लोकव्यवहारात स्थान मिळवले आहे. तिथे स्वतंत्रपणे मराठी भाषेसाठी मोलाची कामे केली गेलेली आहेत. यात हैदराबाद, धारवाड, इंदूर, भोपाळ, बडोदे, गोवा अशी काही महत्त्वाची केंद्रे आपल्याला दिसून येतात. या भागांतून मराठी साहित्यात लक्षणीय भर घालणारे लेखन झाले, नियतकालिके निघाली, प्रकाशने झाली, अनेक भाषाविषयक उपक्रम घेतले गेले. स्वतंत्रपणे आपले अस्तित्व टिकवून ते वृद्धिंगत करण्यासोबतच मराठी भाषेच्या समृद्धीसाठी योगदान दिले.

सध्याच्या परिस्थितीत अनेक भाषिक प्रदेश आपापली भाषिक घनता टिकवून ठेवू शकत नाहीत ही वस्तुस्थिती आहे. जगभर युद्धे, अवर्षणे, नैसर्गिक वा मानवी संकटे तसेच आर्थिक कारणांमुळे मोठ्या प्रमाणात स्थलांतरे होत आहेत. स्थलांतरांमुळे निर्माण झालेल्या परिस्थितीचे भान येणे गरजेचे आहे. यावर भाषिक सौहार्द प्रयत्नपूर्वक वाढवणे हा एक महत्त्वाचा उपाय असू शकतो. भाषा हे विद्वेषाचे, कटुतेचे आणि शत्रुत्वाचे कारण होता कामा नये. मराठीचा विचार करताना जर आपण जगभरातल्या आपल्या भाषकांचा, त्यांच्यापुढील आव्हानांचा, त्यांच्या प्रश्नांचा विचार करत असू तरच हे भान येणे शक्य आहे. मराठी भाषेच्या संवर्धनाबाबत विचार करताना इतर भाषांसोबत सौहार्द वाढवणे हा आपल्या योजनेचा महत्त्वाचा भाग असायला हवा. मराठी भाषक समाज हा जगभर पसरलेल्या मराठी भाषकांनी मिळून बनलेला आहे. त्यामुळे मराठीबद्दल बोलताना केवळ महाराष्ट्रापुरता विचार करून चालणार नाही. भाषेच्या भौगोलिक पसाऱ्याचा व्यापक विचार केला तरच आपल्याला भाषेपुढील अनेक प्रश्नांचा साकल्याने विचार करता येऊ शकेल.

ज्येष्ठ गोमंतकीय मराठी-कोकणी कवी शंकर रामाणी यांचे हे जन्मशताब्दी वर्ष आहे. तसेच गोव्यातील ज्येष्ठ कोकणी साहित्यिक दामोदर मावजो यांचा यंदाच्या भारतीय ज्ञानपीठ पुरस्काराने गौरव झाला आहे. गोव्यात मराठी आणि कोकणी या दोन्ही सख्ख्या भगिनीभाषा सौहार्दाने नांदत असतात. गोव्याचे मराठी भाषिक संस्कृतीत मोलाचे योगदान आहे. या दोन गोमंतकीय साहित्यिकांच्या निमित्ताने या अंकात आम्हाला गोमंतक विशेष विभाग योजता आला याचा आनंद होतो आहे.

विदर्भ साहित्य संघाचे शताब्दी वर्ष १४ जानेवारी २०२२ पासून सुरू झालेले आहे. त्यानिमित्ताने अनेक योजना, कार्यक्रम साहित्य संघातर्फे आयोजण्यात आलेले आहेत. साहित्य संघाच्या या शतकमहोत्सवी वाटचालीत योगदान देणाऱ्या सगळ्यांचे या प्रसंगी स्मरण आणि त्यांना अभिवादन!

**– प्रफुल्ल शिलेदार**

## अनुराधा पाटील यांच्या कविता

### खांब धरून जगताना

किती चाललो मैल न् मैल
कधी सोबत
कधी पाठ फिरवून
पण संपलं नाही
आपल्यातलं हातभर अंतर
आणि थांबवता आली नाही
साधुवाण्याची तीच ती गोष्ट

माझ्याकडे राहून गेलेल्या
तुझ्या जुनाट वहीची पानं
अजून फडफडतात
आणि विस्कटून जाते
तू हौसेनं घातलेली
दारातली रांगोळी

तुझ्या रुजवणीच्या बिया
खडकावर पडून वाया गेल्या
अंकुरल्याशिवाय
आणि घराच्या छतावर
कधीच उगवली नाही
तुझ्यासाठी
झिलमिल चंद्रकोर
तुझे उदास डोळे
अन् स्निग्ध हसणारे ओठ
पाहिले नाहीत कुणी
बुरख्यातला अंधार सोडून
तरी तू आठवत राहतेस मला
सर्व पर्याय
खुले ठेवता आले पाहिजेत
असं समजुतीनं म्हणणारी
तुझ्या ओल येणाऱ्या
घराच्या भिंतीत
आता वाढतो पिंपळ
सळसळणारा
आणि वाट्याला आलेल्या
चतकोर आभाळाच्या कडा कापत
रोज अस्ताला जातो
तुझ्या मनातला
झावळ झावळ तारा
नुसतेच उगवतात मावळतात
तुझे दिवस तुझ्या रात्री
पार होतात अंगावरून
ऋतूही न्हातेधुते...
आणि मनाचा उंबरठा
ओलांडून
किलकिली होत राहतात
फक्त जर्जर देहाची दारं
जिथं तू उभी असतेस
सुन्न अविचल डोळ्यांनी
खांब घट्ट धरून.

• • •

### परतीचे दोर कापून

ज्या रस्त्यांवरून
आपण चालत होतो दीर्घकाळ

दिसणार नाहीत त्यावर आता
इथून पुढं
तुझ्या झिजलेल्या पावलांचे ठसे
की होणार नाहीत भास
वाऱ्यावरून विरून गेलेल्या
तुझ्या बेदम आवाजाचे

आपल्याला सापडली नाही
उलटलेल्या इतिहासाच्या
चाहुलीची
एखादीही आश्वासक खूण
आपल्या संदर्भात
पण मी पुरून ठेवीन तरीही
तुझ्या कवडीमोल जगण्याचा
एखादा तुकडा
आणि विसरून जाईन
उदासीन.

मी विसरेन
वाट चालल्या माणसाला
दादा बाबा करून
तिनं लिहून घेतलेली
ओबडधोबड पत्रं
कळवळ्यानं दाटलेली
जी पडून आहेत
धूळभरल्या माळावर
गतकाळ पोटाशी घेऊन
तुझ्या पाणावलेल्या
डोळ्यांसोबत

कुठूनही रिकाम्या हातानं
परतताना
माहीत होतं तुला
ते उठवतात नेहमीच
फायद्याच्या कलमांखाली
हरळीचं रान
अन् सुकलेल्या ओठांपर्यंत
जाणार नाही

पाण्याचा एखादाही थेंब
याची काळजी घेतात बेमालूम
ते घालतात विळखा
अमरवेल होऊन
सळसळत्या झाडाला
आणि परक्या बांधावर
पोट भरता भरता
चरत जाते भुकेची जखम
देहभर मनभर

सरवा केलेल्या रिकाम्या
रानावर
आता लांबताहेत सावल्या
आणि आपण पोचलो आहोत
अशा ठिकाणी,
जिथं म्हटलं तर
सगळं आपलंच आहे
आणि सुतळीच्या एका
तोड्यावरही
आपला हक्क नाहीय
जन्मजात बाद झालेला

पण उखळात
डोकं घालावं लागणाऱ्या
माणसाची गोष्ट
तर चालतच आलीय
पिढी दर पिढी
जिथं सांगता येईलच
आपल्याला,
आपला न्याय्य हक्क
बेजुबान उखळावर
टाचा घासायला लावणाऱ्या
या जगण्याचे
परतीचे दोर कापून.

• • •

## वारसा

पोतेरं घेऊन झालं की
आई काढायची पांढऱ्या भिंतीवर
गेरूने चंद्र आणि सूर्य
सारखेच दिसणारे
ओळखू न येणारी आकृती
असायची एक काडीमुडी
माहीत नसलेल्या कुठल्यातरी
पूर्वजाची

तो संरक्षक असायचा मूक
आमच्या अभावग्रस्त जगण्याचा
वावरायचा अदृश्य आमच्यात
धूसर नाक डोळे घेऊन
एकमेकांपासून नजरा चोरत
आम्ही ठेवायचो आळीपाळीने
भाकरीचा एवढासा तुकडा
त्याच्यासमोर,
ज्या दिवशी नुसतं पाणी पिऊन
आई जोडायची
रिकाम्या ताटाला हात
आणि साकळत जायचा
काळोख,
चुलीतल्या मंदावलेल्या जाळाला
वळसा घालत
देव्हाऱ्याच्या पाठीमागे
अपरंपार.

ओल्या लाकडांच्या धुराने
गांजलेली आई
ओल आलेल्या जमिनीवर
झोपली की पाठ धरायची तिची
आणि धुमसत राहायचो आम्ही
भिंतीवर आरामात बसलेल्या
त्याच्याकडे पाहात
आमच्या भाकरीचा तुकडा
गिळणारा म्हणून
त्याला दावं लावून
बाजार दाखवायची भाषा
करायचा बाप
बाहेरच्या हातघाईतून
निराश घरी परतल्यावर
त्याच्या नावाचा टाक
अंगणात फेकून
आणि हातोहात निसटून जाणाऱ्या
जगण्याची धग सोसत
चुपचाप निरखत राहायचा
जमिनीतून अनिवार वर येणारी
बुळूबुळू मुंग्यांची रांग

तरी काळोखातून रस्ता
ओलांडताना
आम्ही आठवायचो त्याला
पलीकडच्या काठावर
उजेडात,
पाय ठेवता येऊ दे म्हणून.

आज आई आणि पूर्वज
दोघंही नाहीत माझ्या आसपास
पण तुटता तुटत नाही
त्यांनी बोटाला बांधलेला
वारशाचा धागा.
शब्दांच्या मागचा काळोख
ओलांडताना
मी थकून जाते
भयानं भारलेल्या निर्जन वाटेवर
आणि शोधत राहते
मनातल्या पडक्या भिंतीवर
रेखाटलेला पूर्वजाचा
ओबडधोबड पण सहृदय चेहरा
उजेडाच्या दिशेनं नेण्यासाठी
पावलं टाकत
मागोमाग येणारा.

• • •

## भोवताल

जेव्हा आपल्याला
भीती वाटते घरात
आणि बाहेर पाय टाकण्याची
त्याहून जास्त
तेव्हा तिसरा पर्याय
काय असू शकतो
याचा विचार करून करून
थकतो मेंदू

कळत नाही भोवतीचे लोक
सोबत आहेत
की घेरताहेत चोहीकडून
अदृश्य कडं करत
रचताहेत कट ओठ हलवत
की उच्चारताहेत
सांत्वनाचे काही शब्द
टाकताहेत अंगावर पांघरूण
की ओढताहेत कपडे
सभ्य असण्याची गरज
आणि इच्छा नष्ट करून

आपल्या आत डोकावून
शोधावा नाममात्र दिलासा
तर आतला पोकळ वासा
वाजतो कडकड
आणि होतात भास
पाठीवर कुबड वाढत
असल्याचे

हरवतोय हरेक संवाद
सापडत नाहीय भाषेला
सुहृद शब्द
माणसांशी बोला
किंवा करा संवाद भिंतीशी
खुर्च्या टेबल कपाटाशी
काही फरकच पडत नाही
की मुदलात कुणाला
ऐकायचंच नाहीय काही
स्वतःचं सोडून

अंधारात दिसत नसली तरी
सावली असतेच
निदान द्यावाच लागतो
असा स्वतःला विश्वास
काही तरी असण्याचा
आणि एक एक पाऊल
पुढे टाकत
आत्महत्येच्या काठावर
पोचणाराला आणावं लागतं
परत,
त्याच झिजलेल्या वाटेवरून
दुःखद आठवणींच्या गुहेवर
जड शिळा ठेवत
दम लागेपर्यंत
काही शाबूत असल्याची
खात्री देणाऱ्या गोष्टी
होताहेत दिसेनाशा
आणि रडतोय शेजारचा वेडा
माझी हवा हरवलीय
माझा श्वास हरवलाय
हरवलीय तहान आणि भूक
सर्वग्रासी
होतात भास की थरथरतं
रात्रीच्या काळोखावर कोरलेलं
घराचं छत
जुन्या वर्तुळांना नवी वर्तुळं
येऊन मिळताना

रस्ता रुंद करून
विकासाला हातभार लावण्यासाठी
कापली जाताहेत झाडं
आणि उडताहेत
हवालदिल झालेली पाखरं
दुःखद कलकलाट करत,